दै. लोकमत
दि. १४/०९/२०१७

# वाघ महाविद्यालयात इंजिनिअरिंग टीचर्स डे



नाशिक : इंजिनिअरिंग एज्युकेशन फाउंडेशन पुणे यांच्या नूतन कार्यकारिणीच्या वतीने येथील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात सोमवारी (दि.११) इंजिनिअरिंग टीचर्स डे साजरा करण्यात आला. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. ई. वायुनंदन हे प्रमुख पाहुणे होते. आपल्या भाषणात त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन शिक्षण पद्धतीत बदल करण्यात यावा, असे सुचविले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान के.के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी भूषविले. नाशिक जिल्ह्यातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांनी एकत्र येऊन नाशिकच्या विकासाचा रोडमॅप तयार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. सुनील कुटे यांनी करुन दिला. इंजिनिअरींग एज्युकेशन फाऊंडेशन वाटचालीचा आढावा प्रा. वर्षा पाटील यांनी घेतला. यावेळी विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील २१ प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. के.बी.टी. इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्रा. पवार, प्रा. बिरारी, प्रा. सोनवणे, ककाडे, कापसे, प्रा. शेवाळे, प्रा. कुलकर्णी, प्रा. जुन्नरे, आर. एच. सपट अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. पाटील, प्रा. देशमुख, प्रा. चंद्रात्रे तसेच मातोश्री इंजिनिअरिंगचे प्रा. नाईक, प्रा. भांगळे, प्रा. चोपडे, सपकाळ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. बागल, प्रा. हरक, एमईटी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. मेटांगे तर के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. महेश शेलार, प्रा. वंदना बागल व प्रा. सरोज ढाके यांचा समावेश होता. प्रा. प्राजक्ता विसपुते यांनी सूत्रसंचालन केले प्रा. डॉ. पी. जे. पवार यांनी आभार मानले. (वा.प्र.)